CNRNOMHSN090005672021

# सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जि. सांगली.

(पीठासिन अधिकरी श्री. एस.वाय.वाकचौरे)

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ९२/२०२१**
**निशाणी क्रमांक ३९ खालील आदेश.**

| | | |
|---|---|---|
| ०१. | विजय विठ्ठल पाटील | **वादी.** |
| | *विरुध्द.* | |
| ०१. | उदय विठ्ठल पाटील | **प्रतिवादी.** |

**(०१).** प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार कैफियत दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

**(०२).** अर्ज व त्यावरती वादीने दाखल केलेल्या जबाबाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

**(०३).** उभय पक्षकारांच्या वतीने करण्यात आलेले कथने विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज निकाली काढते वेळी खालील मुद्दे माझे विचारात उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिवादीचा कैफियत दुरुस्तीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | होकारार्थी. |
| २ | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करीताः**–

(०४). प्रतिवादीचे थोडक्यात कथन असे की, वादीने सदरचा दावा जाहीर ठरावासाठी, निरंतर ताकिदीसाठी व नुकसान भरपाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीने निशाणी क्र. २१ कडे प्रस्तुत दाव्याला कैफियत दिली आहे. परंतू, काही कागदपत्रे वेळेत न मिळाल्यामुळे आवश्यक मजकूर कैफियतमध्ये नमुद करण्याचे राहुन गेले आहे. त्यामुळे प्रतिवादी कैफियत कलम ९ मध्ये अर्जात नमुद केल्याप्रमाणे मजकूर नमुद करुन दुरुस्तीची परवानगी मागत आहे. तो मजकूर असा की, "वादी यांनी त्यांचे गट क्र.१५४२–ब मधील वादी यांच्या हिश्यामध्ये वादीच्या हिश्याच्या पूढे असणारे शेतकरी अधिक तानाजी चव्हाण रा. भवानीनगर, ता. तासगांव हे त्यांचे शेतात पाण्याची पाईप लाईन वादीच्या हिश्यातून घेवुन जात असताना, वादी यांना गट क्र. १५४२–ब मध्ये त्यांची स्वतःची पाण्याची व्यवस्था नसतानादेखील सदरच्या शेतक–याच्या पाईप लाईन बरोबर वादीने त्याची पाईप लाईन टाकून त्यावर चेंबर काढले आहे. यातील प्रतिवादी हे शांत स्वभावाचे असल्याने प्रतिवादी यांनी स्वतःच्या हिश्यामध्ये स्वतःच्या नावे पंचायत समितीद्वारे मंजूर केलेल्या विहीरीतून भावाला मदत म्हणून सहानभूतीने एखादया दुस–यावेळी पिकांना अडचणीच्या वेळी पाणी देण्याचे बोलले होते. परंतू वादी हे मालकी हक्काने विहीरीत हिस्सा मागत असल्याने प्रतिवादी यांनी त्यांच्या मालकीच्या विहीरीतून पाणी देण्याचे अमान्य केले आहे. तसेच प्रतिवादीच्या मालकीच्या विहीरीतील प्रतिवादी यांचीच मालकी घालवण्याकरीता गैर मार्गाचा वापर सुरु लागले आहेत."

याप्रमाणे वाढीव मजकूर कैफियतमध्ये नमुद करुन प्रतिवादीने कैफियत दुरुस्तीची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

(०५). सदर अर्जावर वादीने म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, अर्ज व त्यातील मजकूर पूर्णतः खोटा आहे. प्रतिवादीने अर्जासोबत कोणतीही कागदपत्रे जोडलेली नाहीत. गट क्र. १५४२–ब मध्ये झालेले तथाकथीत वाटप गृहीत धरल्यास विहीर ही वादीच्या हिश्यात येते हे प्रतिवादीने जाणून–बुजून लपवून ठेवलेले आहे. गट क्र. १५४२–ब मधील विहीर ही वादी व प्रतिवादीचे वडील विठ्ठल पाटील यांनी ४० वर्षापुर्वी पाडलेली आहे. विठ्ठल महादेव पाटील यांनी त्याबाबत दिनांक ०१.०१.२०२२ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्या विहीरीवर प्रतिवादींनी बोगस शासकीय प्रकरण करुन शासनाची फसवणूक करुन पैसे उकळले आहेत. प्रतिवादीने तलाठयाशी हातमिळवणी करुन स्वतःच्या नावाची विहीरीची नोंद करुन घेतली आहे. परंतू, त्या विहीरीचे वीज कनेक्शन आजही वादी व प्रतिवादींचे वडील विठ्ठल महादेव पाटील यांच्या नावावर आहे. सदर विहीरीमध्ये वादीची आई व बहिण यांचा देखील हिस्सा आहे. यास्तव त्यांनी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

(०६). अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने प्रस्तुतचा दावा जाहीर ठरावासाठी, निरंतर ताकिदीसाठी व नुकसान भरपाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादीने निशाणी क्र. २१ अन्वये प्रस्तुत दाव्यामध्ये कैफियत दाखल केलेली आहे. दावा चौकशीसाठी नेमलेला आहे.

प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी हे त्यांच्या कैफियतमध्ये अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी मागत आहेत. परंतू, अर्जात नमुद केलेला मजकूर हा कैफियत दाखल केली तेव्हाच प्रतिवादी हे कैफियतीतमध्ये नमुद करु शकत होते असे दिसते. परंतू, प्रतिवादीचे असे कथन आहे की, काही कागदपत्रे वेळेत उपलब्ध झाली नाहीत म्हणून त्यांना सदर मजकूर कैफियतीमध्ये नमुद करता आला नाही. प्रस्तुत अर्जासोबत प्रतिवादीने त्यांना नव्याने उपलब्ध झालेली कागदपत्रे जोडलेली दिसत नाहीत. यास्तव प्रतिवादीने अर्जात नमुद केलेले कारण हे संयुक्तिक वाटत नाही. परंतू, दाव्याचा न्यायनिर्णय गुणदोषावर पारीत होण्याकरीता तसेच वारंवारीता टाळण्याकरीता प्रतिवादीने अर्जात नमुद केल्याप्रमाणे कैफियतीमध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी प्रतिवादीला देणे नैसर्गिक न्यायतत्वानुसार उचित होणार आहे. अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती केल्याने वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही असे दिसते. परंतू, प्रतिवादीच्या कृत्यामुळे व सदर दुरुस्ती अर्जान्वये दाव्याचे कामकाज लांबणीवर पडले आहे. त्याकरीता प्रतिवादीविरुद योग्य तो खर्चाचा आदेश पारीत करुन अर्ज मंजूर करणे न्याययोग्य होणार आहे. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीताः</u>-**

**(०७).** मुद्दा क्र.१ चे उत्तरादाखल प्रतिवादी हे विनंतीनुसार दावा दुरुस्ती करण्यासाठी पात्र ठरलेले आहेत. यास्तव मी मुद्दा क्र.२ चे उत्तरादाखल पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**०१.** प्रस्तुतचा अर्ज रक्कम रुपये ५००/– च्या खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

**०२.** खर्चाची रक्कम प्रतिवादीने आज अगर पुढील तारखेस वादीला दयायची आहे. खर्चाची रक्कम भरल्यानंतर प्रतिवादीने मुदतीत दुरुस्ती करुन दुरुस्त कैफियतीची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

SATISH YASHWANT WAKCHAURE
Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2026.03.07 17:15:23 +0530

**तासगांव.** (एस.वाय.वाकचौरे)
दिनांक : ०७.०३.२०२६. सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
**तासगांव**.

मी हमी देतो की, सदरच्या पी.डी.एफ. फाईल मधील सर्व मजकूर हा मुळ आदेशातील प्रत्येक शब्दानुसार बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – श्री. अभय अरविंद रणदिवे

न्यायालय – सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, तासगांव, जिल्हा सांगली.

दिनांक – ०७.०३.२०२६.

न्यायीक अधिकारी यांनी सही केलेली दिनांक – ०७.०३.२०२६.

आदेश अपलोड दिनांक– ०७.०३.२०२६.